MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १३ अंक : ३ पाने : १२ एप्रिल-मे २०१९
E-Magazine visit us on : www.mahatransco.in

*प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,*

आपण नवीन वित्तीय वर्षात पदार्पण करून दोन महिने होत आहेत. त्यामुळे या वित्तीय वर्षात पुन्हा यापूर्वी मिळविले तसेच चांगले यश मिळवावे, अशी साहजिकच अपेक्षा आहे.

सध्याचा कालावधी खूप महत्त्वाचा आहे. कारण, आपल्या महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाचे अखेरचे पावसाळी अधिवेशन सध्या चालू आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात काही ठिकाणी पावसाचे आगमनही झाले आहे. कोणत्याही शासकीय कंपनीच्या दृष्टीने चालू काळ महत्त्वाचा असतो. या काळामध्ये आपली सेवा सतत उत्कृष्ट, कार्यक्षम राहील याची

- *नवीन तंत्रज्ञानाचा वापर करा*
- *अखंडित सेवा देण्यावर भर*
- *पूर्वनियोजन व आखणी करा*
- *चालू वर्षात चांगली कामगिरी करा*

दक्षता आपणास घ्यावयाची आहे. त्यामुळे माझी खात्री आहे की, या कठीण परिस्थितीच्या कालखंडात सर्व प्रयत्नांची पराकाष्ठा करून आपण महापारेषणची कामगिरी उत्तम दर्जाची ठेवाल.

या सामाजिक, राजकीय परिस्थितीसह भविष्यातही आपल्याला आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. येत्या आगामी काळातही आपले महापारेषणचे जाळे, प्रणाली, यंत्रसामुग्री यांना कार्यक्षम ठेवण्याचे आव्हान पेलावयाचे आहे. या आव्हानांचा सामना करण्यासाठी महापारेषण कंपनीला नवनवे पर्यायी उपाय शोधून अंमलात आणावे लागतील व सद्यस्थितीतही दक्ष राहून काम करावे लागेल. मी असे पाहिले आहे की, बहुतांश वेळा निष्काळजीपणामुळे आणीबाणीची परिस्थिती उदभवते, अशी परिस्थिती भविष्यात निर्माण होऊ नये म्हणून आपण दक्ष राहून योग्य ती काळजी घेतली पाहिजे. आपणास यंत्रणेच्या प्रत्येक बाबींची सखोल माहिती असली पाहिजे. त्यामुळे भविष्यात अचानक निर्माण होणाऱ्या परिस्थितीवर आपणास मात करता येईल.

महापारेषण कंपनीचे महत्त्वाचे तांत्रिक प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी दरपत्रक आधारित स्पर्धात्मक बोली पद्धत (TBCB) सुरू केली आहे. विक्रोळी येथे ४०० के. व्ही. क्षमतेचे वीज उपकेंद्र स्थापन करण्यासाठी वरील पद्धतीव्दारे निविदांची कार्यवाही सुरू केली आहे.

चंद्रपूर-पडघा दरम्यान ±५०० के. व्ही. क्षमतेची व्दिष्टधारा तारमार्ग (लाईन) हा वीस वर्षाचा झाल्याने त्याच्याशी संलग्नित पडघे-चंद्रपूर येथील Terminal Stations मधील तंत्रज्ञान बदलण्यासाठी महापारेषण कंपनी विचार करीत आहे. त्यासाठी MACH-1 तंत्रपद्धतीऐवजी MACH-3 ही अद्ययावत तंत्रपद्धती अंमलात आणण्याच्या दृष्टीने विचार करण्यात येत आहे.

याशिवाय आपल्या दूरवर पसरलेल्या पारेषणच्या तारांचे रक्षण करण्यासाठी नव्या ड्रोनवर आधारित तंत्रज्ञान अंमलात आणण्यासाठी आपले प्रयत्न चालू आहेत. यामुळे या लाईन्सवरील धोक्याच्या जागा (हॉटस्पॉट) ओळखता येतील. बंद पडलेल्या ठिकाणी (Breakdown) आणि वीजतारांमध्ये वाऱ्यामुळे होणारे शॉर्ट सर्किट (Flashovers) लवकर शोधून काढणे शक्य होईल. उष्णतेची दृष्टी (Thermal Vision) असलेले कॅमेरे वापरणे, जागा शोधण्यासाठी जीपीएस तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे यंत्रणेची देखभाल व दुरूस्ती करण्याची क्षमता यामध्ये सुधारणा होईल.

पुढील १ एप्रिल २०२० पासून महापारेषणमध्ये डेव्हीएशनल सेटलमेंट मेकॅनिझम (DSM) कार्यपद्धती अंमलात आणण्याचे विचाराधीन आहे. महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्रावर ही पद्धती अंमलात आणण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यासाठी या केंद्राने प्रारूप (नमुन्याची) आकृती रचना तयार करण्याचे काम सुरू केले आहे. डिस्पॅच कोडही तयार होतील. याशिवाय नव्या DSM



**पराग जैन नानोटिया** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

पद्धतीस सुसंगत असे ऊर्जा अंकेक्षण करणे त्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचे सॉफ्टवेअर तयार करणे आणि ऊर्जेचे लेखे नोंदणी यासाठी पद्धती विकसित कराव्या लागणार आहेत.

आपल्या अंतिम टप्प्यावरील ग्राहकांना विश्वासार्ह, परवडेल अशी वीजसेवा देणे व ती अखंडित ठेवणे हे ध्येय आपण सतत मनाशी बाळगले पाहिजे. आपले सर्व नियोजन त्याच दृष्टीने केले जात आहे, हे मला आनंदाने व अभिमानाने सांगावेसे वाटते.

वरील ध्येये व उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आपण सतत सजग राहिले पाहिजे. भविष्यात येणाऱ्या आव्हानांचा, संकटांचा, अपघातांचा अंदाज घेऊन त्या दृष्टीने कामांचे पूर्वनियोजन व आखणी केली पाहिजे.

माझा असा विश्वास आहे की, आपण सर्व अधिकारी व कर्मचारी एकत्रितपणे व उत्साहाने कामे करून ही उद्दिष्टे गाठाल. तसेच गतवर्षीपेक्षाही यावर्षी चालू वित्तीय वर्षात आपण सर्वजण मिळून चांगली कामगिरी करून दाखवाल, अशी अपेक्षा आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- पराग जैन नानोटिया**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

मंत्रिमंडळ निर्णय

■ उद्योग, विकास, रोजगाराला चालना मिळणार ■

# विदर्भ-मराठवाड्यातील उद्योगांना २०२४ पर्यंत विद्युत शुल्क माफ

■ *टीम महापारेषण, मुंबई*

*विदर्भ मराठवाड्यातील उद्योजकांना विद्युत शुल्कात माफीची सवलत २०१३ ते २०१९ पर्यंत देण्यात आली होती. ही सवलत पुढील पाच वर्ष म्हणजे २०२४ पर्यंत लागू करण्यास राज्याच्या मंत्रिमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.*

*ऊर्जा विभागाने सादर केलेल्या या प्रस्तावाला मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी विदर्भ मराठवाड्यात नवीन उद्योग यावेत आणि या भागाचा औद्योगिक विकास होण्याच्या दृष्टीने व रोजगाराला चालना मिळण्यासाठी सकारात्मक भूमिका घेऊन या प्रस्तावाला मान्यता दिली.*

*सामूहिक प्रोत्साहन योजना २०१३ अन्वये राज्यातील उद्योगांना शुल्क माफी, मुद्रांक शुल्क माफी व व्हॅट परतावा असे एकत्रित प्रोत्साहन देण्यात येत होती. ३१ मार्च २०१९ पर्यंत या योजनेचा लाभ उद्योगांना मिळत होता उद्योग धोरण २०१९ नुसार लघु, लहान व मध्यम उद्योग क, ड, डी प्लस नक्षल प्रभावी क्षेत्रातील उद्योगांना विद्युत शुल्क माफ करण्यात आले होते. पण २०१९ च्या नवीन औद्योगिक धोरणात ज्या उद्योगांचा समावेश नव्हता अशा उद्योगांसाठी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२४ पर्यंतची पाच वर्षे विद्युत शुल्क माफ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.*



*औद्योगिक ग्राहकांना ९.३० टक्के दराने शुल्क आकारणी करण्यात येते. विद्युत शुल्क माफ ही सवलत पुढे चालू ठेवली तर शासनावर वार्षिक ६०० कोटी रूपयांचा भार पडणार आहे. या सवलतीमुळे विदर्भ व मराठवाड्यातील उद्योगांमध्ये व उत्पादनात वाढ झाली व रोजगार निर्मितीलाही चालना मिळाली. महाराष्ट्रात ऊर्जा क्षेत्रात २१७७७४.१ कोटी रूपयांची गुंतवणूक झाली असताना विदर्भ मराठवाड्यात १५७२०४.१ कोटी गुंतवणूक झाली आहे.*

*उद्योगांमध्ये दिवसेंदिवस निर्माण होत असलेल्या स्पर्धेत विदर्भ-मराठवाड्यातील उद्योग टिकून राहावेत, किंबहुना या क्षेत्रात नवीन उद्योगांची संख्या वाढावी व रोजगाराला चालना मिळावी म्हणून विद्युत शुल्क माफीचा निर्णय घेण्यात आला आहे.*





## महापारेषणची सद्यस्थिती

६७३ अति उच्च दाब उपकेंद्रे कार्यान्वित



■ महापारेषणच्या डिजिटलचे पुढचे पाऊल; वेळ, पैशांची बचत ■

# 'ईआरपी' प्रणालीमुळे कार्यालयीन कामकाजात सुधारणा

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महापारेषण कंपनीमध्ये 'ईआरपी' प्रणाली सुरू झाल्यापासून कार्यालयीन कामकाजात अनेक सुधारणा झाल्या आहेत. मानव संसाधन आणि वित्त व लेखा विभाग यांच्या समन्वयाने ERP-SAP प्रणालीव्दारे दोन महत्त्वाच्या संकल्पना एप्रिल २०१९ पासून सुरु करण्यात आल्या आहेत. मुख्यत्वे मानव संसाधन व वित्त या विभागात 'ईआरपी' आधारित प्रणालीमुळे वेळ व पैसा यांची बचत होऊन कामकाजामध्ये पारदर्शकता आली आहे.

HR-FI Salary Auto Posting या नवीन संकल्पनेमुळे मानव संसाधन विभागाव्दारे SAP HR Payroll Module मध्ये तयार करण्यात आलेल्या वेतनाच्या नोंदी मानवी हस्तक्षेपाविरहित SAP FICO Module मध्ये होणार आहेत. या लेखा नोंदी (Salary Auto Posting) महापारेषण कंपनीकरिता सांघिक कार्यालय, मुंबई येथून स्वयंचलित पद्धतीने केल्याने अचुकता येणार आहे.

Centralised Salary Disbursement या नवीन पद्धतीचा अवलंब केल्यामुळे कंपनीतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन एकाच दिवशी सांघिक कार्यालयातून अदा केले जाणार आहे. या सुधारित पद्धतीमुळे वेतननिधी पाठविण्याकरिता व अदा करण्याकरिता लागणारा वेळेमध्येही बचत झाली आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या बँकेमध्ये वेतन अदा करण्यामध्ये सुलभता आली आहे. यामुळे कंपनीस आर्थिक फायदाही होण्यास मदत झाली आहे.




संचालक (वित्त) श्री. विनायक साठे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) श्री. अनिल कालेकर यांच्या समन्वयातून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. यासाठी महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा. सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. मिलिंद मोहिरे, कार्यकारी अभियंता (ईआरपी) (प्रभारी) श्री. ज्ञानेश्वर बोबडे यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच ERP-HR Core Team मधून अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. मनोज जैयस्वाल, व्यवस्थापक (मा.सं.) श्री. संतोष कडलग, ERP-FI Core Team मधून सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्रीमती लीना कसरेकर, व्यवस्थापक (विवले) श्रीमती मंजुषा चौधरी, व्यवस्थापक (विवले) श्रीमती अनघा धाऊसकर, माहिती तंत्रज्ञान विभागांतर्गत कु. भावना कोळी (प्रोग्रॅमर), वेतन व देयके विभागातील उ.लि. (मा.सं.) श्रीमती वैशाली काळे व निधी व्यवस्थापन विभागातील सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. अशोक रेळेकर, वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) श्री. अभिजित कारंजकर यांनी परिश्रम घेतले.

बजेट

■ भविष्यातही वीजटंचाई नाही ■

# शेतकऱ्यांसह दुर्बल घटकांना दिलासा देणारा अर्थसंकल्प : ऊर्जामंत्री

■ *टीम महापारेषण, मुंबई*

राज्यातील शेतकऱ्याला समृध्द करणे व ग्रामीण भागात पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देणारा, ओबीसी मुला-मुलींना सवलत तसेच पाचवी ते दहावीतील मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती योजना जाहीर करून शैक्षणिक विकास साधणारा व दुर्बल घटकांना दिलासा देणारा हा अर्थसंकल्प अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सादर केल्याची प्रतिक्रिया ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली.

विधिमंडळात अर्थमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी सन २०१९-२०२० चा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया व्यक्त करताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ``ऊर्जा विभाग अधिक मजबूत करून शेतकऱ्यांना पूर्ण दाबाने वीजपुरवठा करता यावा म्हणून विदर्भ-मराठवाड्यातील प्रलंबित कृषी पंपांना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे कनेक्शन देण्यासाठी लागणारा १९५४ कोटी रुपये अर्थसंकल्पातून महावितरणला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तर उर्वरित महाराष्ट्रात ही योजना राबवण्यासाठी २५४२ कोटी निधी खुल्या बाजारातून उभारण्यास शासनाने या अर्थसंकल्पातून मंजुरी दिली आहे.``



भारनियमन मुक्त असलेल्या महाराष्ट्रात वीजचे प्रमाण मुबलक आहे. मात्र भविष्यात विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन १३२० मेगावॅटच्या औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पाला लागणाऱ्या ८ हजार ४०७ कोटींना अर्थमंत्र्यांनी तत्वत: मान्यता दिली. यामुळे राज्यात भविष्यात विजेची टंचाई जाणवणार नाही.

वृध्द, निराधार, दिव्यांग, विधवा या समाजातील दुर्बल घटकांना या अर्थसंकल्पातून मदतीचा हात अर्थमंत्री मुनगंटीवार यांनी दिला आहे. दुर्बल घटकांचे जीवन सुसह्य व्हावे म्हणून संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ निराधार योजनांमार्फत मिळणाऱ्या ६०० रूपये अर्थसाह्यांवरून १००० रूपये अर्थसाह्य करण्यात आले आहे. कोणतीही करवाढ न सुचवणारा व समाजातील सर्व घटकांना दिलासा देणारा हा अर्थसंकल्प असून आपण या अर्थसंकल्पाचे स्वागत करत असल्याचे श्री. बावनकुळे म्हणाले.

टेस्ट चार्ज

■ अधिकाऱ्यांनी केली पाहणी ■

# नाशिक परिमंडळात वाहिन्यांची व उपकेंद्रांची कामे गतीने

■ *टीम महापारेषण, नाशिक*

अति उच्च दाब प्रकल्प तथा संचलन व सुव्यवस्था नाशिक अंतर्गत वाहिन्यांची व विविध उपकेंद्रांची कामे कार्यान्वित करण्यात आली.

यामध्ये १३२ के. व्ही. दुहेरीपथ तारा ओढणे १३२ के. व्ही. नंदूरबार रेल्वे कर्षण उपकेंद्र ३.५ कि.मी., १३२ के. व्ही. दुहेरीपथ तारा ओढणे १३२ के. व्ही. नरडाना रेल्वे कर्षण उपकेंद्र २.३७ कि.मी., जीईसी अंतर्गत १X१३२ के. व्ही. वाहिनी बे २२० के. व्ही. बाभळेश्वर उपकेंद्र व १x१३२ के व्ही. वाहिनी बे २२० के. व्ही. राहुरी, २२० के. व्ही. उपकेंद्र, मनमाड येथे २२०/१३२ के. व्ही. रोहित्र-२, २x२२० के. व्ही. वाहिनी बे २२० के. व्ही. मालेगाव येथे वाहिनी, वाहिनी बे व रोहित्र कार्यान्वित करण्यात आले.

यासाठी मुख्य अभियंता सर्वश्री जयंत विके, अधीक्षक अभियंता प्रवीण भालेराव, अधीक्षक अभियंता शरद लोखंडे, अधीक्षक अभियंता (प्रभारी) दीपक पाटील, कार्यकारी अभियंता मोहन महाजन, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) सुमंत मुंडे, कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. कुंदन पवार, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) विनोद ढोरे यांच्या उपस्थितीत कार्यान्वित करण्यात आले.



**नाशिक :** अति उच्च दाब प्रकल्प तथा संचलन व सुव्यवस्था नाशिक अंतर्गत विविध वाहिन्यांची व उपकेंद्रांची कामे कार्यान्वित करण्यात आली. याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी वर्ग.

## तुफान आलंया..!




**औरंगाबाद :** पाणी फाऊंडेशनच्या महाश्रमदानात सहभागी झालेले महापारेषणचे अधिकारी व कर्मचारी.

### ■ महाराष्ट्रदिनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पुढाकार ■

# पाणी फाऊंडेशनच्या महाश्रमदानात महापारेषणचा सहभाग

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून अति उच्च दाब प्रकल्प व संवसु परिमंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पाणी फाऊंडेशनच्या महाश्रमदानात आपला सहभाग नोंदविला.

अति उच्च दाब स्थापत्य बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. संदीप हाके यांनी या कामाकरिता पुढाकार घेऊन महाश्रमदानाकरिता नावनोंदणी केली. पाणी फाऊंडेशनकडून महाश्रमदानाकरिता महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी खंडी पिंपळगाव या गावाचे क्षेत्र देण्यात आले होते. सकाळी अकरा वाजल्यापासून कामास सुरूवात झाली. सर्वांनी एकत्रित श्रमदान करून दुपारपर्यंत काम पूर्ण केले.

महाश्रमदानाकरिता अधीक्षक अभियंता श्री. संदीप हाके, अधीक्षक अभियंता श्री. महेद्र वाळके, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठा सहभाग नोंदविला.

### ■ शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहणार ■

# औरंगाबाद येथे खुल्या व्यायामशाळेचे उदघाटन

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडल औरंगाबाद येथे खुल्या व्यायामशाळेचे उदघाटन मुख्य अभियंता श्री. अविनाश कोंडावार यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटनाला अउदा प्रकल्प मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. अनिल भारसाकळे, अउदा व संवसु मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. महेंद्र वाळके, चाचणी व दूरसंचार मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. शामकांत वसेकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. प्रवीण यशवंते यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अति उच्च दाब स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. संदीप हाके यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम पूर्णत्वास आले.

उपकेंद्रामध्ये काम करणारे कर्मचारी, १३२ के. व्ही. उपकेंद्र वसाहतीतील कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय, प्रशासकीय इमारतीतील अधिकारी व कर्मचारी यांना या खुल्या व्यायामशाळेचा फायदा होत आहे. व्यायामशाळेमुळे अधिकारी व कर्मचारी यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहण्यास मदत होत आहे.

**Health is Wealth**





### *महापारेषणची सद्यस्थिती*

४७३९८ स.कि.मी. अ.उ.दा. वाहिन्या



मोहीम फत्ते

# महापारेषणच्या अधिकाऱ्यांनी केले पांगरचुला शिखर सर

■ ५९ तास ३५ मिनिटांत मोहीम यशस्वी ■

■ *टीम महापारेषण, पुणे*

महापारेषणच्या अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडल, पुणे येथील अधिकाऱ्यांनी हिमालयातील उत्तराखंड येथील पांगरचुला शिखरावर यशस्वीरित्या चढाई करून मोहीम फत्ते केली.

या शिखराची उंची १४,७०० फूट आहे. ही मोहीम फत्ते करण्यासाठी त्यांना ५९ तास ३५ मिनिटे इतका वेळ लागला. या मोहीमेस त्यांना ट्रेक द हिमालया या संस्थेने सहकार्य केले.

पुणे कार्यालयातील १३२ के. व्ही. कामथडी उपकेंद्राचे उपकार्यकारी अभियंता श्री. नागेश ठोंबरे, २२० के. व्ही. कोंढवा उपकेंद्राच्या उपकार्यकारी अभियंता कु. प्रीती बोरघरे, वाहिनी देखभाल उपविभाग, बारामतीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. संतोष भोसले, २२० के. व्ही. चिंचवड उपकेंद्राचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. नंदकिशोर ढाकणे, कराड परिमंडळाचे उपकार्यकारी अभियंता श्री. मनोज पवार यांनी दि. ३ मे ते ११ मे २०१९ रोजी ही मोहिम यशस्वी केली. मोहीमेत सहभागी होणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांचे अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, पुणेचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. वंदनकुमार मेंढे यांनी अभिनंदन केले.



हेल्थ-वेल्थ



# वाशी येथे मोफत महिला आरोग्य शिबिर

■ *टीम महापारेषण, वाशी*

वाशी परिमंडळामध्ये महिला कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांकरिता क्लाऊडनाईन रूग्णालय यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये ४६ महिला कर्मचाऱ्यांनी शिबिराचा लाभ घेतला. शिबिर यशस्वी करण्यासाठी मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. जगन्नाथ चुडे, उपकार्यकारी अभियंता श्री. अमरकांत गाडिगोने, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. दादासाहेब दाईगडे यांनी परिश्रम घेतले.



***महापारेषणची सद्यस्थिती***

१२८२६५ एम.व्ही.ए. स्थापित क्षमता



एकीचे बळ

■ कंपनीची तीन लाखांची बचत ■

# पालघर उपकेंद्रात कर्मचाऱ्यांनी केले रंगकाम

■ *टीम महापारेषण, वाशी*

बोईसर विभागीय कार्यालयांतर्गत १३२/३३ के. व्ही. पालघर उपकेंद्रामध्ये कार्यरत असलेले सर्व तंत्रज्ञ कर्मचारी व बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनी उपकेंद्राच्या यार्डातील सर्व सीटी, पीटी, एम.के. बॉक्स आदी उपकरणांचे रंगकाम केले. यामुळे महापारेषण कंपनीची तीन लाखांची बचत झाली आहे.

उपकार्यकारी अभियंता श्री. हर्षल सरोदे यांनी नेमून दिल्याप्रमाणे कर्मचाऱ्यांनी कमी वेळेत काम पूर्ण केले. या कामासाठी पेंट, ब्रश साहित्य खरेदीसाठी दहा हजार रुपये खर्च आला.

या कामासाठी श्री. जान मोहम्मद शेख, श्री. विनोद राऊत, श्री. पी. जे. पाटील, श्रीमती अश्विनी राऊत, श्री. कुलदीप घरत, श्री. जमीर तांबोळी, श्री. अक्षय घरत, श्री. अजय पाटील, श्री. राहुल पवार यांचे सहकार्य लाभले.



**पालघर :** १३२/३३ के. व्ही. पालघर उपकेंद्रामध्ये कार्यरत असलेले सर्व तंत्रज्ञ कर्मचारी व बाह्यस्त्रोत कर्मचारी.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग ■

# महापारेषणच्या वर्धापनदिनी पडघे येथे रक्तदान शिबिर



**पडघे :** महापारेषण कंपनीच्या वर्धापनदिनानिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले. याप्रसंगी प्रमाणपत्र देताना अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री. डावीकडून श्री. चैतन्य जाधव, श्री. सागर कोठावळे, डॉ. गौरी बागूल, श्रीमती सुरेखा वैरागे, श्री. विजय गायकवाड, कु. पल्लवी काइतकर, श्री. उमेश वाकचौरे, निलेश भोईर, अतुल आळशी.

■ *टीम महापारेषण, वाशी*

महापारेषण कंपनीच्या पंधराव्या वर्धापनदिनानिमित्त उच्च दाब दिष्ट धारा ग्रहण केंद्र, संचलन व सुव्यवस्था मंडल, पडघे येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. यामध्ये ३३ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

रक्तपेढी व रक्तघटक विलगीकरण केंद्र, जिल्हा रूग्णालय, ठाणे यांच्याव्दारे हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. जिल्हा रूग्णालय ठाणे येथील डॉ. गौरी बागूल व डॉ. पल्लवी काइतकर, महापारेषणचे अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची निवृत्ती माहे एप्रिल-मे २०१९

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. श्रीकांत सदाशिव काळे | अधीक्षक अभियंता | राज्य भार प्रेषण केंद्र, अंबाझरी | ३०.०४.२०१९ |

Power for All

■ शेतीपंपांना योग्य दाबाने वीजपुरवठा होणार ■

# २२० के. व्ही. नेर उपकेंद्र कार्यान्वित

■ *टीम महापारेषण, अमरावती*



२२० के. व्ही. बडनेरा-नेर वाहिनी व २०० के. व्ही. नेर उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले. त्यामुळे नेर तालुक्यातील शेतीपंपांना योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे.

नेर तालुक्यामध्ये ३३ के. व्ही. उपकेंद्रांना १३२ के. व्ही. दारव्हा उपकेंद्रातून वीजपुरवठा होत होता. परंतु, ३३ के. व्ही. वाहिन्यांची लांबी जास्त असल्यामुळे कमी दाबाचा वीजपुरवठा होत होता. त्यामुळे हे उपकेंद्र कार्यान्वित करणे गरजेचे होते. मुख्य अभियंता श्री. भाऊराव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंता श्री. प्रफुल्ल औघड (प्रकल्प), श्री. गोविंद जाधव (स्थापत्य), श्री. रूपेश फरकाडे (चाचणी), कार्यकारी अभियंता श्री. सुनील शेरेकर (प्रकल्प), श्री. दिगंबर वाघ (स्थापत्य), श्री. शंकर जाधव (चाचणी) यांनी परिश्रम घेतले.

सर्वांसाठी वीज

■ तालुक्यात योग्य दाबाने वीजपुरवठा होणार ■


# २२० के. व्ही. उपकेंद्र वाडा कार्यान्वित



■ *टीम महापारेषण, वाडा*


२२० के. व्ही. उपकेंद्र वाडा, विभाग बोईसर, ता. वाडा, जिल्हा पालघर येथे २२०/२२ के. व्ही. ५० एमव्हीए, ट्रान्सफार्मर नं.२ सुरळीतपणे कार्यान्वित करण्यात आला. यामुळे वाडा तालुक्यातील सर्व गावांना योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे.

हा ५० एमव्हीए, ट्रान्सफार्मर नं.२, कमी वेळेत दुरूस्त करून कार्यान्वित करण्यात आला. या कामासाठी अधीक्षक अभियंता कळवा सर्वश्री महेश भागवत, कार्यकारी अभियंता बोईसर विभाग राजेश दखणे, वाडा उपकेंद्र उपकार्यकारी अभियंता शैलेश सयाम, सुशांत तायडे, योगेश चौधरी, सहाय्यक अभियंता हर्षद दळवी, अब्दुल शेख व त्यांचे सहकारी चाचणी विभाग, कळवा यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## *महापारेषणची सद्यस्थिती*

एप्रिल-२०१९ पर्यंत ९९.५९ पारेषण प्रणाली उपलब्धता





**मुंबई :** 'महापारेषण' चे मुख्यालय असलेल्या 'प्रकाशगंगा' येथे ध्वजारोहणप्रसंगी 'महापारेषण'चे संचालक (वित्त) श्री. विनायक साठे. शेजारी 'महापारेषण'चे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी वर्ग.

# महाराष्ट्र दिन व कामगार दिन महापारेषणमध्ये उत्साहात साजरा



■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) ५९ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रकाशगंगा येथील मुख्यालयात 'महापारेषण'चे संचालक (वित्त) श्री. विनायक साठे यांनी ध्वजारोहण केले. यावेळी 'महापारेषण'चे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सर्वश्री सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे, कार्यकारी अभियंता (प्रभारी) महेंद्र वाकळे, दक्षता अधिकारी बी.एम.पाटील, शिष्टाचार अधिकारी सतिश जाधव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## *महापारेषणची सद्यस्थिती*

हिंजवडी, कर्जत येथे ४०० के.व्ही. उपकेंद्रे प्रस्तावित



जय भीम

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

सुरुवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाव्यवस्थापक (मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. महेंद्र वाकळे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जय बसवण्णा

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी



■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सुरुवातीला महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. अनिल कालेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, महाव्यवस्थापक (मा.सं.,आस्थापना) श्री. राजू गायकवाड, मुख्य अभियंता (अभिकल्प) श्री. एस. एन. भोपळे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. बी. एम. पाटील, वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) (अं. ले.), वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) (आर्थिक मूल्यांकन/प्रशासन व्यवहार) श्रीमती आरती रामटेके, श्रीमती भारती कांबळे यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. महेंद्र वाकळे यांनी मानले.



## *महापारेषणची सद्यस्थिती*

शिवाजीनगर (धुळे), नाशिक येथे ४०० के.व्ही. उपकेंद्रे प्रस्तावित



शिक्षण-प्रशिक्षण

■ मा.सं.विभागातील अधिकाऱ्यांनी घेतला सहभाग ■

# पडघे येथे एकदिवसीय कार्यशाळा

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषण कंपनीतील शिस्तभंग कार्यवाही प्रणाली सुटसुटीत करण्यासाठी ERP, HR Core Team ने Disciplinary Action module in SAP या विषयावर एक दिवसाची कार्यशाळा पडघे येथे घेण्यात आली. सातही परिमंडलातील मानव संसाधन विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी या कार्यशाळेत आपला सहभाग नोंदविला.

याप्रसंगी उपस्थितांना महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. सुधीर वानखेडे यांनी उपक्रमामागील उद्देश सांगितला. या कार्यशाळेसाठी प्रशिक्षण केंद्रप्रमुख व पडघा कार्यालयाचे अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री तसेच सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) कु. डॉ. शीतल गेडाम यांनी परिश्रम घेतले. या दरम्यान, HR-FI Auto posting या विषयावर चार दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन ERP-HR आणि ERP-FI Core Team ने यशस्वीरित्या पार पाडले. त्यासाठी मुख्य महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) श्री. अनिल कालेकर, महाव्यवस्थापक (मा. सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.



**पडघे :** मानव संसाधन विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेप्रसंगी महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री यांच्यासह अधिकारी व कर्मचारी.

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# तळंदगे येथे विविध प्रशिक्षण कार्यक्रम




**तळंदगे :** सारथी प्रशिक्षण केंद्रात विविध प्रशिक्षण कार्यशाळेप्रसंगी अधिकारीवर्ग.

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

सारथी प्रशिक्षण केंद्र, तळंदगे कराड परिमंडल येथे एप्रिल २०१९ या महिन्यांत विविध प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.


प्रशिक्षणामध्ये नवीन रूजू झालेल्या अतिरिक्त कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता (पारेषण व स्थापत्य) यांचेसाठी SAP-SRM चे Hands on Refresher प्रशिक्षण, मा.सं. व वित्त व लेखा या कर्मचाऱ्यांसाठी Service Regulation, Noting-Drafting, Labour Laws प्रशिक्षण, तसेच उपकेंद्रातील कार्यरत वर्ग-३ व ४ कर्मचाऱ्यांसाठी उपकेंद्र, सुरक्षा व सेवा नियम याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी मुख्य अभियंता सर्वश्री विकास बढे, अधीक्षक अभियंता सुनील माने, रंगनाथ चव्हाण, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) इमाम सिद्धीकी यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षण केंद्र समन्वयक श्री. नितीन डाके यांनी परिश्रम घेतले.



*महापारेषणची सद्यस्थिती*

आरे (मुंबई), पडघे-II येथे ४०० के.व्ही. उपकेंद्रे प्रस्तावित



# बदलते व्यवस्थापन

बदल एक काळाची गरज ठरते. बदलाला सामोरे जाणे हेच आपल्या हाती असते. काळानुरूप बदल घडणे प्रकृतीचा नियम आहे. आधुनिक जीवनात सर्व ठिकाणी यांत्रिकीकरण होताना आपण पाहतो. आपली कार्यकुशलता नेहमीच्या/सततच्या कामासाठी खर्च न होता ती अधिक महत्त्वाच्या कामामध्ये खर्च होण्याकरिता यांत्रिकीकरण महत्त्वाची गोष्ट आहे.

हे यांत्रिकीकरण होत असताना आपल्याला प्रथम हे यांत्रिकीकरण अंगीकृत करता आले पाहिजे. त्यानंतर आपल्याला आपली बुद्धीमत्ता व श्रम अधिक महत्त्वाच्या कार्यावर खर्च करणे अपेक्षित असते.

बदल घडताना आपल्यामध्ये एक मानसिकता राहते. आपल्या ठरलेल्या सवयी मोडावयास किंवा बदलावयास तयार नसतो. आपल्या मनामध्ये भ्रम राहतो हा बदल आपल्यावर लादला आहे. त्यामधून नकारात्मकता तयार होते. त्यामुळे बदलाला अंगीकृत न करता तो बदल आपण निष्क्रीय कसा करू त्याकरिता प्रयत्नात असतो.

आपण लक्षात ठेवले पाहिजे की, 'केल्याने होत आहे रे...' त्याकरिता प्रथम आपली मानसिकता बदलणे महत्त्वाची बाब ठरते. त्यामुळे या बदलाची आवश्यकता व महत्त्व आपल्याला कळते व आपण त्या बदलास सामावून घेण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.

नवीन कौशल्य व ज्ञान विकसित करण्याकरिता बदल एक उत्तम माध्यम आहे. बदलामुळे आपल्याला नवीन कौशल्य विकसित करून नवनवीन संधी प्राप्त होऊ शकतात. आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी त्यास चालना मिळते.

आज आपण नवीन काय शिकलो, असा ध्यास आपल्या मनात असला पाहिजे. प्रत्येक दिवस किंबहुना प्रत्येक क्षण आपल्याला ज्ञानाची नवीन पातळी गाठण्यासाठी आला पाहिजे, तरच आपण प्रगतीच्या वाटेवर चालू शकू. प्रगती म्हणजेच जीवन.

जो थांबला तो संपला. एक ध्यास आपली ज्ञानांची कक्षा वाढविण्याकरिता...धडपड ज्ञान ग्रहण करण्याकरिता... या वायुमंडळात एवढे ज्ञान आहे की, अख्खं आयुष्य ते ग्रहण करण्याकरिता कमी पडेल.

त्याकरिता थांबून व समाधानी होऊन चालणार नाही. सतत आपले वैचारिक मंथन होणे गरजेचे आहे. सर्जनशीलतेचा भरपूर वापर करून आपल्या कार्यकुशलतेला एक नवीन आयाम देता आला पाहिजे.

आज काय केले पाहिजे की, ज्यामुळे माझ्या कंपनीला पुढे घेऊन जाण्यास मदत होईल. अतिशय भाग्यवान असल्यामुळे आपल्याला कंपनीमध्ये कामगिरी करण्याची संधी मिळाली व त्या संधीचे आपल्याला सोने करता आले पाहिजे.

त्याकरिता आपल्या मनातील भेदभाव, जडत्व, नकारात्मकता दूर करून आपण ध्येयवादी असले



सततचे पुनर्विलोकन केले असता आपल्याला कोणता सकारात्मक बदल करायला पाहिजे, त्याबद्दल माहिती होते. त्यामुळे आपल्याला नवनवीन कल्पना सुचतात. या कल्पना आपण अनुभवी व ज्ञानी व्यक्तींबरोबर चर्चा करून व त्यानुसार कृती करून नियोजन पद्धतीने त्या कल्पना खऱ्या अर्थाने राबविता आल्या पाहिजेत.

आपली ओळख या कल्पना राबविल्याने राहते. मी पाहिजे. आपल्या परीने कंपनीबद्दल कृतज्ञता दूर करण्याचे एक उत्तम माध्यम म्हणजे बदलास अनुरूपता दर्शवून संपूर्ण आत्मीयतेने त्यास सामावून घेणे.

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

**संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)**
E-mail : prohr@mahatransco.in
**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)**

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.